# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः05.12.2024** **वारःगुरुवार**

---

1. महायुतीकडून सत्ता स्थापनेचा दावा,
2. राज्याचे 21 वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचा आज शपथविधी,
3. नवं सरकार राज्याच्या प्रगतीसाठी काम करणार, फडणवीस यांची ग्वाही
4. चंद्रपूर, गडचिरोली आणि नागपूर जिल्ह्यात भूकंपाचे धक्के आणि
5. पुरुष कनिष्ठ आशिया हॉकी स्पर्धेत भारत पाचव्यांदा अजिंक्य

**<u>मुख्यमंत्री-फडणवीस</u>**

राज्याचे 21 वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस आज शपथ घेणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इतर नेत्यांच्या उपस्थितीत संध्याकाळी मुंबईच्या आझाद मैदानावर शपथविधी होणार आहे. फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत, तसंच उपमुख्यमंत्री आणि अन्य मंत्र्यांचा शपथविधीही होणार आहे. भाजपाच्या गाभा समितीच्या काल झालेल्या बैठकीत भाजपाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी फडणवीस यांची निवड करण्यात आली आणि मुख्यमंत्री पदासाठी त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं. या प्रक्रियेसाठी मुख्य निरीक्षक म्हणून केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यावेळी उपस्थित होते. नवनिर्वाचित आमदार चंद्रकांत पाटील आणि सुधीर मुनगंटीवार यांनी फडणवीस यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. त्याला सर्व आमदारांनी पाठिंबा दिल्यानंतर पक्षनेतेपदी फडणवीस यांची निवड जाहीर करण्यात आली.

**<u>महायुती-सत्ता स्थापना</u>**

दरम्यान, महायुतीच्या नेत्यांनी काल राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन सत्ता स्थापनेचा दावा केला. यावेळी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि इतर नेत्यांनी भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्रपक्षांच्या एकंदर 237 आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र राज्यपालांना दिलं. यावेळी केंद्रीय मंत्री निर्मला सितारामन आणि भाजपा नेते विजय रूपाणीदेखील उपस्थित होते.

**<u>पत्रकार परिषद</u>**

महायुतीचे प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी काल मुंबईत पत्रकार परिषद घेऊन नव्या सरकारच्या शपथविधी सोहोळ्याची माहिती दिली. महायुतीत आतापर्यंत सर्व निर्णय एकत्रितपणे घेतले गेले असून यापुढेही एकत्र राहून निर्णय घेऊ, असं भाजपा विधिमंडळ पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. महायुतीला विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशाचा उल्लेख करत फडणवीस यांनी जनतेचे तसंच भाजपा नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, जेपी नड्डा आणि आरपीआयचे अध्यक्ष रामदास आठवले यांचे आभार मानले. नवं सरकार राज्याच्या प्रगतीसाठी काम करेल, अशी ग्वाही यावेळी फडणवीस यांनी दिली. महायुती सरकारनं गेल्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात अनेक लोककल्याणकारी उपक्रम राबवले असून नव्या सरकारमध्येही एकसंधपणे काम करू असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं, तर महायुतीत कोणतेही मतभेद नाहीत, असं स्पष्ट करत, राज्याच्या सर्वांगिण विकासासाठी, तसंच विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी प्रयत्न करू, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार म्हणाले.

**भाजप जल्लोष**

भारतीय जनता पार्टीच्या गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांच्या निवडीची घोषणा आणि मुख्यमंत्री म्हणून शपथविधी होणार असल्याचं स्पष्ट होताच राज्यात पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केल्याचं वृत्त आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांनी दिलं आहे.

**सिस्टीम**

अधिकाधिक पारदर्शकता आणून गतीनं कामं मार्गी लावण्यासाठी पुणे महापालिका प्रशासनानं इंटीलिजंट वर्क्स मॅनेजमेंट सिस्टीमचा वापर सुरू केला आहे. यामुळं एकाच ठिकाणी विविध विभागांची कामं करताना कामांचं नियोजन, दुबार कामं रोखणं यांसह कामाचं पूर्वगणनपत्रक तयार करण्यापासून ते कामाचं देयक देण्यापर्यंतची सर्व कामं ऑनलाइन आणि कागद-विरहित होणार आहेत. याबाबत पुणे महापालिकेचे शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांनी अधिक माहिती दिली.....

**नौदल दिन**

नौदल दिनानिमित्त काल देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल संध्याकाळी ओडिशातील पुरी इथल्या ब्लू फ्लॅग समुद्र किनाऱ्यावर आयोजित नौदलाच्या विशेष कार्यक्रमाला हजेरी लावली. यावेळी 15 हून अधिक जहाजे, पाणबुड्या आणि 40 हून अधिक विमानं, सागरी कमांडो आणि जवानांनी नौदलाची क्षमता आणि सामर्थ्य दर्शविणाऱ्या थरारक प्रात्यक्षिकं सादर केली. भारतीय नौदल देशाची सागरी सुरक्षितता सदैव करत राहील. सागरी व्यापाराद्वारे जगभरात विस्तार करण्यासाठी पाठबळ देत, देशाच्या आर्थिक विकासाचे संरक्षण करेल आणि देशाला 2047 पर्यंत विकसित भारत बनवण्यासाठी  पाठिंबा देईल, असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं.

**संगीत स्वयंवर**

मराठी संगीत रंगभूमीचा बालगंधर्व युगातील सुवर्णकाळ पुन्हा अनुभवण्याची संधी पुणेकर नाट्यरसिकांना मिळणार आहे संगीत स्वयंवर नाटकाच्या विशेष प्रयोगातून. बालगंधर्व संगीत रसिक मंडळातर्फे रविवारी, दहा डिसेंबरला सकाळी साडेनऊ वाजता बालगंधर्व रंगमंदिरात हा प्रयोग आयोजित करण्यात आला आहे. मंडळाचे अध्यक्ष सुरेश साखवळकर यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली...

**नटसम्राट बालगंधर्व यांनी 10 डिसेंबर 1916 रोजी 'संगीत स्वयंवर या नाट्याचार्य काकासाहेब खाडिलकर यांनी लिहिलेल्या आणि देवगंधर्व भास्करबुवा बखले यांनी संगीत दिलेल्या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग मुंबईत सादर केला होता. त्याच वैभवी थाटात हा नवा प्रयोग होणार असून, यात रूक्मिणीची भूमिका अस्मिता चिंचाळकर साकारणार आहेत. त्याच्याबरोबर चिन्मय जोगळेकर, वर्षा जोगळेकर, सुदिप सबनीस, अवंती बायस, संजय गोसावी, विजय कुलकर्णी आणि निरंजन कुलकर्णी हे कलाकार आहेत. रूक्मिणीची भूमिका साकारताना बालगंधर्व जो शेला वापरत असत तो पाहण्याची संधीही प्रेक्षकांना मिळणार आहे. यावेळी बालगंधर्वांच्या वंशजांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. हे नाटक पाहिल्यानंतर राम गणेश गडकरी यांचे डोळे दिपले होते आणि त्यानंतरच त्यांच्या एकच प्याला या नाटकाचा जन्म झाला होता. अशी माहितीही साखवळकर यांनी दिली. आकाशवाणी बातम्यांसाठी नितीन जळूकर यांच्यासह प्राची गावस्कर पुणे.**

**भूकंप- गडचिरोली**

चंद्रपूर, गडचिरोली तसंच नागपूर जिल्ह्यात काल सकाळी साडेसातच्या सुमारास  भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता 5 पूर्णांक 3 रिख्टर होती आणि तेलंगण राज्यातील मुलुगु इथं या भुकंपाचा केंद्रबिंदू

होता, असं राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्रानं जाहीर केलं आहे. या भूकंपाच्या धक्क्यांमुळं कोणतीही जिवित वा वित्तहानी झाल्याचं वृत्त नाही.

**<u>जंतनाशक गोळी-गडचिरोली</u>**

राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त राज्यात एक ते 19 वर्षे वयोगटातील मुलामुलींना जंतनाशक गोळ्या देण्याची मोहीम सुरु करण्यात आली असून, दहा डिसेंबरपर्यंत ही मोहीम सुरु राहणार आहे अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई यांनी दिली. गडचिरोली जिल्ह्यातील 10 तालुक्यांमधील 1 लाख 72 हजार मुलांना काल ठिकठिकाणी आरोग्य विभागाच्या वतीनं जंतनाशक गोळी देण्यात आली. या मोहिमेपासून वंचित राहिलेल्या बालकांना 10 डिसेंबरला ही गोळी देण्यात येणार असल्याचं जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर प्रताप शिंदे यांनी सांगितलं.

**<u>नदी जोड प्रकल्प-अकोला</u>**

बहुप्रतिक्षित वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या सर्वेक्षणाच्या कामाला लवकरच सुरुवात होण्याची चिन्हं आहेत. या प्रकल्पामुळं अकोला जिल्ह्यातील 84 हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून, चार नवे सिंचन प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. नागपूर जिल्ह्यातील गोसीखुर्द सिंचन प्रकल्पापासून या प्रकल्पाची सुरुवात होणार असून नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम आणि बुलढाणा या सात जिल्ह्यातून हा नदीजोड प्रकल्प जाणार आहे. विदर्भाच्या सहा जिल्ह्यांमधील 41 प्रकल्पांना त्याद्वारे पाणी दिलं जाणार आहे.

**<u>दारू- सिंधुदुर्ग</u>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात झाराप इथं काल पहाटे गोवा बनावटीची बेकायदेशीर दारू वाहतूक केल्याप्रकरणी राज्य उत्पादन शुल्कच्या पथकानं दोघांना ताब्यात घेतलं. त्यांच्याकडून 61 लाख 28 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. राज्य उत्पादन शुल्काच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार मुंबई-गोवा महामार्गावर झाराप इथं संशयित वाहनाची तपासणी करत असताना ट्रकमध्ये ही दारू आढळून आली.

**<u>आंदोलन-नंदुरबार</u>**

नंदुरबारमध्ये अद्यापही भारतीय कापूस महासंघामार्फत कापसाची खरेदी सुरू न झालेली नाही, त्यामुळं शेतकऱ्यांना कापसाचा निर्धारीत हमी भाव मिळत नाही, याविरोधात काल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं रस्ता रोखा आंदोलन करण्यात आलं. पळाशी इथं असणाऱ्या सुतगिरणीजवळ कार्यकर्त्यांनी आंदोलन केल्यानं महामार्गावर प्रचंड वाहतूककोंडी झाली होती.

**<u>हॉकी</u>**

पुरुषांच्या हॉकी कनिष्ठ आशिया करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत काल भारतानं पाकिस्तानचा 5-3 गोलनं पराभव करुन पाचव्यांदा अजिंक्यपद मिळवलं. अरईजित सिंग हुंडालनं भारतासाठी चार गोल गेले. हॉकीमध्ये भारत आशियात अजेय आहे हे भारतीय संघानं सिद्ध करताना प्रभुत्व, कौशल्य आणि काठीण्य दाखवलं असं हॉकी इंडियानं म्हटलं आहे. कनिष्ठ आशिया करंडक स्पर्धा पुढील वर्षी भारतात होणाऱ्या पुरुषांच्या एफआयएच हॉकी कनिष्ठ विश्वचषक स्पर्धेसाठी पात्रता स्पर्धा आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि विजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**